एस.सी.सी. क्र. १९/२०१८
सरकार...वि..ईश्वर नगराळे
निशाणी क्र. १० खाली

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ८ ची साक्ष शपथेवर सुरुः-**

माझे नाव – पुंडलिक रामचंद्र चव्हाण,
वय – ५७ वर्ष, व्यवसाय– पी. एस. आय.
राहणार – पोलीस स्टेशन दत्तापुर, ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री. व्ही. पी. सोगे यांचे मार्फत सुरू:-**

०१. दिनांक १७.१०.२०१७ रोजी मी पोलीस स्टेशन दत्तापुर येथे हेड कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. अपराध क्रमांक २४५/२०१७ चा उर्वरित तपास मी केला. तपासाकामी मला केस डायरी सोबत जबानी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवाल, घटनास्थळ पंचनामा प्राप्त झाला होता. तपासादरम्यान मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. आरोपीला समजपत्रावर सोडले. गुन्हयातील मोटार सायकल आरोपीकडून जप्त केली. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर जप्ती पंचनाम्याला **नि. क्र. २५** देण्यात येते. मी ज्या आरोपीला सुचनापत्रावर सोडले होते तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. तपासाअंती आरोपीने फिर्यादीच्या मुलाला धडक मारून जखमी केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास संपला.**

**साक्षीदाराचा उलटतपास आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री. जी. एस. तांबटकर यांचे मार्फत सुरू:-**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी तथाकथित घटनास्थळावर जाउन प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे बयाण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीची ओळख परेडची कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी जप्त केलेल्या गाडीचा तांत्रिक अहवाल आर.टी.ओ. अमरावती कडून प्राप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी फक्त फिर्यादीच्या नातेवाईकांचे बयाण नोंदविले आहे व खोटे बयाण नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही तपास न करता आरोपीविरूध्द खोटे दोषारोपपत्र दाखल

केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

समक्ष,

स्वा./–
**(लुष्णाली ली. तामगाडगे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र २, धामणगाव रेल्वे

दि. १०.०४.२०२६